# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरींग सातारा

## नियामक मंडळ (गव्हर्नींग बॉडी) सभा क्र.०८, दि. १६.०२.२०२३ इतिवृत्तांत

जा. क्र. ग.ब.स./सभा८/२०२३/ दिनांक - १६.०२.२०२३

**नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र. ०८**

**दिनांक - गुरुवार दि. १६.०२.२०२३**

**वेळ - दुपारी ०३.३० वाजता**

**स्थळ - कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा**

या महाविद्यालयाची नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) ची आठवी सभा **गुरुवार दि. १६.०२.२०२३ दुपारी ०३.३० वाजता** मा. आ. दिलीप वळसे पाटील साहेब - चेअरमन नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केलेली आहे. तरी सर्व सन्माननीय सदस्यांनी सभेस उपस्थित राहून मार्गदर्शन करावे, ही विनंती.

**विषय - पत्रिका**

| विषय | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| विषय क्र. १ | मागील नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र ०७. दि. ०४.१०.२०२२ रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे.<br>मागील नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र ०७. दि. ०४.१०.२०२२ रोजीच्या सभेमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयावरील केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे. | |
| विषय क्र. २ | माहे ०१.०४.२०२२ ते ३१.१२.२०२२ अखेरच्या तेरीजपत्रकास व सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकास सभेची मंजुरी घेणे.<br>**अ. तेरीजपत्रक ब. अंदाजपत्रक** | |
| विषय क्र. ३ | कै. भूपाल अण्णा बहीशेट, व श्रीमती लीलावती व देवेंद्र बसप्पा दोड्ण्णावर यांच्या स्मरणार्थ देण्यात येणारे पारितोषिक हे महाविद्यालयात प्रत्येक विभागात प्रथम आलेल्या विद्यार्थी व विद्यार्थीनीस दिलेल्या पारितोषिकाबाबत माहिती देणे. | |
| विषय क्र. ४ | महाविद्यालयातील सेवकांनी रयत शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यालयासमोर करणेत आलेल्या आंदोलन व उपोषणानंतर महाविद्यालयात निर्माण झालेल्या विविध मुद्द्याबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. ५ | NBA कमिटी भेटीच्या अनुषंगाने महाविद्यालयात करावयाच्या कामकाजाबाबत.<br>१. NBA कमिटी भेटीच्या तारखेबाबत चर्चा करणे.<br>२. NBA साठी जात असलेल्या महाविद्यालयातील तीन विभागामध्ये प्रत्येकी एक सहयोगी प्राध्यापक संस्था पातळी वर नियुक्ती करणेबाबत चर्चा करणे.<br>३. महाविद्यालयात कार्यरत असलेले शिक्षकेत्तर सेवक (कनिष्ट लिपिक व प्रयोगशाळा सहाय्यक) यांना ११ महिन्याची नेमणूक आदेश देणेबाबत चर्चा करणे.<br>४. NBA कडून NBA कमिटीच्या भेटीच्या तारखेबाबत आलेल्या स्मरणपत्राबाबत चर्चा करणे | |
| विषय क्र. ६ | प्रा. शेलार ए. बी. व डॉ. तपासे ए. बी. यांनी मा. सचिव रयत शिक्षण संस्था सातारा यांना पाठविणेत आलेल्या ईमेल व पत्राबाबत चर्चा करणे. | |

| | | |
|---|---|---|
| विषय क्र. ७ | कायम शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांनी केलेल्या विविध मागणी अर्जाबाबत. मुद्दा क्र. १,२,३,४,५,६. | |
| विषय क्र. ८ | Dean Administration व Controller of Examination यांनी तडकाफडकी दिलेल्या राजीनामाबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. ९ | महाविद्यालयातील खरेदी समिती बाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. १० | महाविद्यालयात कायदेशीर अडचणी व समस्या निर्माण होत असतात त्याकरिता स्वतंत्र कायदा तज्ञ यांची नियुक्ती करणेसाठी परवानगी मिळावी. | |
| विषय क्र. ११ | महाविद्यालयातील चतुर्थश्रेणी सेवकांना सन २०१२-१३ पासून ते सेवानिवृत्त कालावधीत भोगलेल्या अर्जित रजेमधून रजा खातेवर शिल्लक असलेल्या रजेचे रजा रोखीकरण प्रस्तावास मंजुरी मिळणे. | |
| विषय क्र. १२ | महाविद्यालयातील इलेक्ट्रिकल मेंटेनन्स बाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. १३ | महाविद्यालयातील विविध विभागातील कामकाजाकरिता टेन्डर मागविली आहेत त्याची माहिती देणे. | |
| **विषय क्र. १४** | **महाविद्यालयातील प्रशासकीय व आर्थिक बाबीविषयी मंजुरी घेणे.** | |
| विषय क्र. १४.०१ | पी.एफ. चा दंड भरणेस परवानगी मिळणेबाबत. | |
| विषय क्र. १४.०२ | NBA कमिटी अनुषंगाने विविध विभागातील कामकाजासाठी येणाऱ्या खर्चास परवानगी मिळणेबाबत. | |
| विषय क्र. १४.०३ | महाविद्यालयातील प्लंबिंग चे काम करणेत आलेल्या खर्चास परवानगी मिळणेबाबत. | |
| विषय क्र. १४.०४ | मुलींच्या वसतीगृहामध्ये नवीन पिण्याच्या पाण्याचा कुलर खरेदी करणेस परवानगी मिळावी. | |
| विषय क्र. १४.०५ | कायम शिक्षकेत्तर सेवकांनी १२ वर्ष कालबद्ध पदोन्नती फरकाच्या रक्कमेस परवानगी मिळणेबाबत. | |
| विषय क्र. १४.०६ | IT Cell विभागातील विविध परीक्षेमध्ये काम करत असलेल्या सेवकांच्या मानधनाबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. १४.०७ | वर्कशॉप मधील रोजंदारी तत्वावर काम करीत असलेल्या सेवकांच्या मानधनाबाबत. | |
| विषय क्र. १४.०८ | कु. आशितोष राजेंद्र शिंदे या विद्यार्थ्याने शिष्यवृत्ती मिळणेबाबत केलेल्या अर्जाबाबत. | |
| विषय क्र. १४.०९ | कु. शुभम बी. भिंगवडे या विद्यार्थ्याच्या शैक्षणिक फी माफ करून शाळा सोडल्याचा दाखला मिळणेबाबत सादर केलेल्या अर्जाबाबत. | |
| विषय क्र. १४.१० | श्री. कदम एम. व्ही. भांडारपाल यांनी निलंबनापूर्वी खरेदी केलेल्या NAAC काळातील बिलांबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. १४.११ | मार्च २०२२ मध्ये पुणे येथे झालेल्या खरेदी समितीच्या सभेकरिता झालेल्या खर्चास परवानगी मिळणेबाबत. | |

| | | |
|---|---|---|
| विषय क्र. १५ | मा. चेअरमन याचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे. | |
| विषय क्र. १५ .०१ | महाविद्यालयातील वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले शिक्षकेत्तर सेवकांनी विविध मागण्यासाठी केलेल्या अर्जाबाबत. | |
| विषय क्र. १५ .०२ | महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रवेशाबाबतची सभेस माहिती देणे | |
| विषय क्र. १५ .०३ | महाविद्यालयातील एम.टेक या विद्याशाखेचे प्रवेश (Admission) सातत्याने कमी होत आहेत, त्याबाबत चर्चा करणे. | |
| | | |

**प्राचार्य तथा सचिव**
नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी)
कर्मवीर भाऊराव पाटील
कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा

प्रति- सर्व सन्माननिय नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सदस्य
सोबत - १. विषयावरील टाचण
२. मागील सभेचा इतिवृत्तांत

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरींग सातारा

## नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) सभा क्र.०८, दि. १६.०२.२०२३ इतिवृत्तांत

जा. क्र. ग.बॅ.स./सभा८/२०२३/ दिनांक — १६.०२.२०२३

**नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. ०८**

**दिनांक** - **गुरुवार दि. १६.०२.२०२३**

**वेळ** - **दुपारी ०३.३० वाजता**

**स्थळ** - **कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा**

कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग या महाविद्यालयाची नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) ची आठवी सभा **गुरुवार दि. १६.०२.२०२३ दुपारी ०३.३० वाजता** मा. आ. दिलीप वळसे पाटील साहेब - चेअरमन नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) यांचे अध्यक्षपदी संपन्न झाली. यासभेस खालील मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित सदस्य –

| अ.क्र. | सदस्य नाव | पद |
|---|---|---|
| १. | मा. दिलीप वळसे - पाटील | चेअरमन |
| २. | मा. डॉ. अनिल पाटील साहेब<br>चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा | निमंत्रित |
| ३. | मा. सचिव साहेब<br>रयत शिक्षण संस्था, सातारा | सदस्य |
| ४. | मा. सहसचिव (उ.शि)<br>रयत शिक्षण संस्था, सातारा | निमंत्रित |
| ५. | मा. प्रतापराव पवार | सदस्य Online |
| ६. | प्रा. डॉ. एम बी कुमठेकर | सदस्य |
| ७. | मा. श्री. उदय जाधव | सदस्य |
| ८. | डॉ. एस. एल.नलबलवार | सदस्य Online |
| ९. | मा. डॉ. डी . व्ही. जाधव<br>सहसंचालक, तंत्रशिक्षण संचलनालय | सदस्य |
| १०. | डॉ. एस. व्ही. माने | सदस्य |
| ११. | प्रा. डॉ. ए. सी. अत्तार | सदस्य / सचिव |

सर्वप्रथम सभेचे सदस्य सचिव तथा मा. प्राचार्य यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले आणि मा. आ. दिलीप वळसे पाटील साहेब महाविद्यालयाचे नियामक मंडळाचे चेअरमन यांच्या अध्यक्षतेखाली सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

## विषयावरील ठराव

**विषय क्र. १ :- मागील नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र ०७. दि. ०४.१०.२०२२ रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे. तसेच मागील नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र ०७. दि. ०४.१०.२०२२ रोजीच्या सभेमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयावरील केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.**

**ठराव क्र. ०१ :-** मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. ०७, दि. ०४.१०२०२२ रोजीचा इतिवृत्तांत सोबत आपल्या अवलोकनार्थ जोडला आहे. तरी सदर इतिवृत्तांचे अवलोकन करून तो मंजूर करणेत यावा अशी विनंती आहे.

मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. ०७, दि. ०४.१०.२०२२ मध्ये घेणेत आलेल्या निर्णयावरील कार्यवाही ठरावाअनुक्रमे खालील प्रमाणे आहे.

खालील तेरीजपत्रक व अंदाजपत्रक सभेने अवलोकन केलेलं, व त्यानुसार खालील प्रमाणे सभेने त्यास मंजुरी दिली.

| ठराव | निर्णय | निर्णयावरील कारवाई |
|---|---|---|
| ठराव क्र.०१. | मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. ०७ दि. ०४.१०.२०२२ इतिवृत्तांत वाचून कायम करणे तसेच निर्णयावरील कार्यवाहीची सभेने नोंद घेतली. | नोंद घेण्यात आली. |
| ठराव क्र. ०२. | मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. ०७ दि. ०४.१०.२०२२ रोजीच्या सभेमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयावरील केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे | नोंद घेण्यात आली. |
| ठराव क्र. ०३ | महाविद्यालयातील विविध उपक्रमांची माहिती बाबत | याबातत चर्चा झालेली नाही. पुढील सभेमध्ये विषय घेण्याचे ठरले. |
| ठराव क्र ०४ | शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई (FRA) यांच्या कडून मंजूर झालेल्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ च्या फी बाबत चर्चा करणे. | चर्चा करणेत आली व No Upward Revison करण्याचा निर्णय झाला. |
| ठराव क्र. ०५ | महाविद्यालयातील कायम शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांनी विविध सादर केलेल्या अर्जाबाबत चर्चा करणे व निर्णय घेणे. | नोंद घेण्यात आली. |
| ठराव क्र. ०६ | श्री. डी. बी. देवी यांच्या **additional increment** बाबत संस्थेकडून आलेल्या पत्राबाबत चर्चा करून निर्णय घेणे. | याबाबत शिखर संस्थेचे मार्गदर्शन घेणेबाबत ठरले. |
| ठराव क्र. ०७ | श्री. मनोहर कदम यांच्या निलंनाबाबत केलेले कार्यवाही बाबत चर्चा करणे. | नोंद घेण्यात आली. |
| ठराव क्र. ०८ | महाविद्यालयातील शिक्षक सेवकांनी .पीएचडी. /एम.ई. /एम.टेक शैक्षणिक अर्हता धारण केलेनंतरची पगारवाढी बाबत केलेल्या अर्जाबाबत चर्चा करणे. | याबाबत शिखर संस्थेचे मार्गदर्शन घेणेबाबत ठरले. |

| | | |
|---|---|---|
| ठराव क्र. ०९ | महाविद्यालयातील एकूण २५ कायम शिक्षकेत्तर सेवक औद्योगिक न्यायालय यांचे कडे दाद मागणेसाठी गेलेले आहेत याबाबत चर्चा करणे. | नोंद घेण्यात आली. |
| ठराव क्र. १० | सेवानिवृत्त झालेले कायम शिक्षकेत्तर सेवकांनी नियमानुसार वेतनआयोग, महागाई भत्ता,ग्राच्युईटी, १२ व २४ वर्ष पूर्ण केल्यानंतर कालबद्ध पदोन्नती व इतर भत्ते फरक मिळणेबाबत केलेल्या अनेक अर्जाबाबत चर्चा करणे. | नोंद घेण्यात आली. |
| ठराव क्र. ११ | कॉम्प्युटर विभागातील नवनियुक्त ADHOC शिक्षक सेवकांच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी पगाराबाबत मंजुरी घेणे. | नोंद घेण्यात आली. सभेने मंजुरी दिली |
| ठराव क्र. १२ | शिक्षकेत्तर सेवकांच्या किरकोळ रजा (CL) ०८ वरून १२ करणे व शिक्षक सेवकांचे अर्जित रजा (EL) बाबत चर्चा करणे व निर्णय घेणे. | नोंद घेण्यात आली. शिक्षकांना EL रजेस मंजुरी दिली. |
| ठराव क्र. १३ | सकाळ समूहाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या **Educon at Australia** मध्ये सहभाग होणेबाबत चर्चा करणे. | नोंद घेऊन सभेने सहभागी होण्यास मंजुरी दिली. |
| ठराव क्र. १४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ मधून परत शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांची सलंग्नता घेणे बाबत चर्चा करणे. | नोंद घेण्यात आली. सेभेने रयत क्लस्टर विद्यापीठ मध्ये सहभागी होण्याबाबत सुचविले. |
| ठराव क्र. १५ | **महाविद्यालयातील प्रशासकीय व आर्थिक बाबीविषयी मंजुरी घेणे.** | -- |
| ठसव क्र. १५.१ | महाविद्यालयातील विविध विभागातील कामकाजाकरिता टेंन्डर मागविली आहेत त्याची माहिती देणे व चर्चा करणे. | त्यानुसार अंमलबजावणी करणेत आली |
| ठराव क्र. १५.२ | महाविद्यालयासाठी खालील बाबी खरेदी करणेसाठी मंजुरी घेणे. १.**कॅमेरा** २. **Portable PA System** ३.**College Prospect**, ४. **College Magazine** ५. **NBA related** प्रिंटींग | नोंद घेण्यात आली. सभेने खरेदी करणेस मंजुरी दिली |
| ठराव क्र. १५.३ | नवीन लिफ्ट साठी येणा-या जादा खर्चास मंजुरी घेणे. | नोंद घेण्यात आली. सभेने खर्चास मंजुरी दिली |
| ठराव क्र. १५.४ | महाविद्यालयातील प्रत्येक विभागातील विद्यार्थांच्या प्रोजेक्ट व संशोधन करणे करिता येणाऱ्या खर्चास मंजुरी घेणे. | नोंद घेण्यात आली. सभेने खर्चास मंजुरी दिली |
| ठराव क्र. १५.५ | महाविद्यालयातील IT INFRASTURE & NETWORK UPDATION बाबत चर्चा करणे व खर्चास मंजुरी घेणे. | नोंद घेण्यात आली. सभेने खर्चास मंजुरी दिली |
| ठराव क्र.. १५.६ | महाविद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांच्या फी सवलती बाबत चर्चा करून निर्णय घेणे. | नोंद घेण्यात आली. शिष्यवृत्ती देण्याची मंजुरी दिली. |
| ठराव क्र. १६ | **महाविद्यालय प्रवेश प्रक्रिया FC Centre** (सुविधा केंद्र) बाबत माहिती देणे . | नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| ठराव क्र. १७ | **मा. चेअरमन याचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.** | -- |
| ठराव क्र.. १७.१ | शैक्षणिक वर्ष २०२१ - २२ मधील हंगामी शिक्षकांना नियुक्ती आदेश संपलेनंतर केलेल्या कामाचे मानधन अदा करणेस सभेची मंजुरी घेणे. | सदर सेवकांना मानधन देणेस मंजुरी दिली |
| ठराव क्र. १७.२ | महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख यांनी विद्यापीठ परिनियमातर्गत कामकाज होणेबाबत देलेल्या अर्जाबाबत. | नोंद घेण्यात आली. व नियामक मंडळाच्या सभेणे निर्णय घेतल्या नुसार कामकाज करणेचे ठरले |
| ठराव क्र. १७.३ | टेरेसवरील प्रस्तावित बहुदेशिय सभागृह व महाविद्यालय परिसरातील लिफ्ट बसविणे बाबत चर्चा करणे. | नोंद घेण्यात आली. व सदर कामकाजास FSI विकत घ्यावा लागत असल्यामुळे हे काम स्थगित ठेवण्यात आले. |
| ठराव क्र. १७.४ | महाविद्यालयातील M.E. या अभ्यासक्रमाची संपादणूक रद्द केल्याने उर्वरित फी माफीबाबत केलेल्या अर्जावर चर्चा करणे. | नोंद घेण्यात आली व फी माफ करणेत आली. |
| ठराव क्र. १७.५ | महाविद्यालयामध्ये रिक्त असलेले TPO या पदावर नवीन सेवकाची नियुक्ती करणेबाबत चर्चा करणे. | सदर पदावर TPO ची नियुक्ती करणेत आली. |

**सूचक :- मा. श्री. उदय जाधव**
**अनुमोदक :- मा. श्री. प्रतापराव पवार**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. २ :-** माहे दि. ०१.०४.२०२२ ते ३१.१२.२०२२ अखेरच्या तेरीजपत्रकास व सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकास सभेची मंजुरी घेणे.

**ठराव क्र. ०२ – खालील प्रमाने तेरीजपत्रक व अंदाजपत्रक –**

**अ. तेरीजपत्रक** - महाविद्यालयाच्या माहे दि. ०१.०४.२०२२ ते ३१.०१.२०२३ अखेरचे तेरीजपत्रक समेच्या अवलोकनार्थ सोबत जोडले आहे. त्याचे अवलोकन करून मार्गदर्शन करून मंजुरी मिळावी. याबाबत महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली त्यानुसार सभेने चर्चा करून महाविद्यालयाच्या तेरीजपत्राचे अवलोकन करून तेरीजपत्रकास मंजुरी दिली.

## KARMAVEER BHAURAO PATIL COLLEGE OF ENGINEERING, SATARA

## RECEIPT & PAYMENTS - 01.04.2022 TO 31.01.2023

| RECEIPTS | AMOUNT (IN LAKHS) | AMOUNT (IN LAKHS) | PAYMENTS | AMOUNT (IN LAKHS) | AMOUNT (IN LAKHS) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| **COLLEGE FEES** | 1,079.55 | 1,079.55 | **SALARY EXPENSES** | | |
| | | | TEACHING STAFF | 511.31 | |
| **OTHER INCOME** | | | NON TEACHING STAFF | 156.52 | 667.83 |
| CONSULTANCY - CIVIL DEPT. | 6.62 | | | | |
| CONSULTANCY - COMPUTER DEPT. | 0.56 | | **NON SALARY EXPENSES** | | |
| CONSULTANCY - MECHANICAL DEPT. | 0.33 | | REPAIR & MAINTENANCE | 16.90 | |
| CONSULTANCY - ELECTRONICS DEPT. | 0.13 | | ELECTRICITY EXPENSES | 14.13 | |
| CONSULTANCY - ONLINE EXAM | 1.58 | | CLEANING & HOUSEKEEPING | 11.94 | |
| CONSULTANCY - ERP/SOFTWARE | 28.05 | | SECURITY EXPENSES | 7.81 | |
| BANK INTEREST ON SAVINGS | 2.02 | | AFFILIATION & INSPECTION | 1.74 | |
| BANK INTEREST ON FD & GRATUITY | 0.65 | | MUNCIPAL TAX & RENT | 7.81 | |
| OTHER | 1.33 | 41.27 | INSURANCE | 0.00 | |
| | | | ADVERTISEMENT | 1.43 | |
| | | | GATHERING/FUNCTIONS/WELFARE | 6.32 | |
| | | | RESEARCH & DEVELOPMENT | 6.51 | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | TRAINING & PLACEMENT | 0.29 | |
| | | | CONFERENCE & SEMINAR | 0.67 | |
| | | | MEETING & COMMUNICATION | 5.97 | |
| | | | STATIONERY EXPENSES | 4.45 | |
| | | | LAB EXPENSES | 0.32 | |
| | | | LIBRARY | 3.10 | |
| | | | COMPUTERS & EQUIPMENTS | 65.50 | |
| | | | FURNITURE | 10.45 | |
| | | | OTHER EXPENSES | 11.67 | 177. |
| | | | | | |
| | | | **CONSULTANCY EXPENSES** | | |
| | | | CONSULTANCY - CIVIL DEPT. | 3.71 | |
| | | | CONSULTANCY - COMPUTER DEPT. | 1.37 | |
| | | | CONSULTANCY - MECHANICAL DEPT. | 0.11 | |
| | | | CONSULTANCY - ELECTRONICS DEPT. | 0.14 | |
| | | | CONSULTANCY - ONLINE EXAM | 11.67 | |
| | | | CONSULTANCY - ERP/SOFTWARE | 16.48 | 33. |
| | | | | | |
| **TOTAL RECURRING RECEIPTS** | | 1,120.82 | **TOTAL RECURRING PAYMENTS** | | 878 |
| | | | | | |
| **OTHER RECEIPTS** | | | **OTHER PAYMENTS** | | |
| BRANCH USANWAR | 9.91 | | RAYAT SHIKSHANT SANSTHA | 40.00 | |
| FEE & OTHER DEPOSITS | 11.95 | | PERSONAL A/C (STAFF) | 18.41 | |
| SALARY DEDUCTIONS | 25.01 | | FIXED DEPOSITS | 250.00 | |
| MISCELLANEOUS & OTHER | 27.23 | 74.10 | KBP POLYTECHNICS | 1.85 | |
| | | | MISCELLANEOUS & OTHER | 6.34 | 316. |
| | | | | | |
| **GRAND TOTAL** | | 1,194.92 | **GRAND TOTAL** | | 1,194.9 |

**ब. अंदाजपत्रक - संस्था नियमानुसार सादर करावयाचे सन २०२३-२४ चे मूळ अंदाजपत्रक सभेच्या अवलोकनार्थ सोबत जोडले आहे. त्याचे अवलोकन करून मंजुरी मिळावी.**

**याबाबत महाविद्यालयाचे मा.** प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली त्यानुसार सभेने चर्चा करून महाविद्यालयाच्या अंदाजपत्रकाचे अवलोकन करून अंदाजपत्रकास मंजुरी दिली.

**RAYAT SHIKSHAN SANSTHA'S**

**KARMAVEER BHAURAO PATIL COLLEGE OF ENGINEERING**

**BUDGET ( UG )**

**Period From 1-4-2023 to 31-3-2024**

| INCOME | | Amount (in Lakhs) | EXPENDITURE | | Amount (in Lakhs) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | Fees (B.Tech.) | 1,379.54 | | Salary Expenses | 996.05 |
| | Donations | 85.46 | | Affiliation / Inspection Fees | 8.15 |
| | Gratuity Provision | 120.00 | | Insurance Expenses | 2.10 |
| | Consultancy | 100.00 | | Repair & Maintenance (All Depts.,Furniture, Electrical,Equipment,Computers) | 71.00 |
| | M.Tech Section | 6.83 | | Audit Fees | 0.50 |
| | | | | FRA/ARA Fees | 7.00 |
| | | | | Advertisement (Admission/General) | 10.00 |
| | | | | Social Gathering/Function Exp./Student Welfare | 20.50 |
| | | | | Research Development Expenses | 40.00 |
| | | | | Training & Placement Expenses | 10.00 |
| | | | | Bank Commission/Charges | 0.40 |
| | | | | Conference & Seminar Expenses (Staff & Student) | 15.00 |
| | | | | Consultancy Remuneration Expenses | 50.00 |
| | | | | Professional Charges/Membership Fees | 7.00 |
| | | | | Meeting Expenses | 19.00 |
| | | | | Communication Exp. (Internet,Telephone,Postage) | 7.00 |
| | | | | Printing & Stationery Expenses | 8.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | Establishment Exp. (Electricity, Security, Water,Garden,A/c Writing) | 76.00 |
| | | | | Lab Expenses/Softwares | 11.00 |
| | | | | Other Expenses (NBA Exp.,Guest Remu.,Misc. Exp.) | 17.20 |
| | | | | Rent & Taxes | 76.85 |
| | | | | Books, Periodicals & Journals | 22.00 |
| | | | | Computers, CCTV, Scanner, Projectors, UPS, Batteries | 67.00 |
| | | | | Lab Equipments (BSH,Mech.,Civil,Elect.,Computer,Work shop) | 115.50 |
| | | | | Furniture | 25.00 |
| | | | | Supervision Expenses (Sanstha) | 2.75 |
| | | | | M.Tech Section | 6.83 |
| | | | | | |
| | **Total** | 1,691.83 | | **Total** | 1,691.83 |

**RAYAT SHIKSHAN SANSTHA'S**

**KARMAVEER BHAURAO PATIL COLLEGE OF ENGINEERING**

**BUDGET ( BUILDING )**

**Period From 1-4-2023 to 31-3-2024**

| INCOME | | Amount (in Lakhs) | EXPENDITURE | | Amount (in Lakhs) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | Donation | 10.00 | | Repairs & Maintenance - Building | 10.00 |
| | | | | | |
| | **Total** | 10.00 | | **Total** | 10.00 |

**RAYAT SHIKSHAN SANSTHA'S**

**KARMAVEER BHAURAO PATIL COLLEGE OF ENGINEERING**

**BUDGET ( PG )**

**Period From 1-4-2023 to 31-3-2024**

| INCOME | | Amount (in Lakhs) | EXPENDITURE | | Amount (in Lakhs) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | Fees (M.Tech.) | 2.82 | | Salary Expenses | 4.96 |
| | KBP Usanwar | 4.01 | | Affiliation Inspection Fee | 0.90 |
| | | | | Repairs & Maintenance - Equipments | 0.10 |
| | | | | Bank Commission | 0.02 |
| | | | | Students Sports & Gymkhana Activities | 0.05 |
| | | | | Travelling & Conveyance Exp. | 0.05 |
| | | | | Printing & Stationery Exp. | 0.05 |
| | | | | Lab Expenses | 0.10 |
| | | | | Misscellaneous Exp. | 0.10 |
| | | | | Library Books | 0.10 |
| | | | | Furniture & Deadstock | 0.40 |
| | | | | | |
| | **Total** | 6.83 | | **Total** | 6.83 |

**RAYAT SHIKSHAN SANSTHA'S**

**KARMAVEER BHAURAO PATIL COLLEGE OF ENGINEERING**

**BUDGET ( LADIES HOSTEL )**

**Period From 1-4-2023 to 31-3-2024**

| INCOME | | Amount (in Lakhs) | EXPENDITURE | | Amount (in Lakhs) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | Hostel Rent | 7.50 | | Repair & Maintenance Expenses | 1.92 |
| | | | | Audit Fees | 0.03 |
| | Donation | - | | Communication Expenses | 0.05 |
| | | | | Establishment Expenses | 4.30 |
| | | | | Other Expenses | 1.00 |
| | | | | Furniture & Equipment | 0.20 |
| | | | | | |
| | **Total** | 7.50 | | **Total** | 7.50 |

RAYAT SHIKSHAN SANSTHA'S

KARMAVEER BHAURAO PATIL COLLEGE OF ENGINEERING

BUDGET ( GENTS HOSTEL )

Period From 1-4-2023 to 31-3-2024

| INCOME | | Amount (in Lakhs) | EXPENDITURE | | Amount (in Lakhs) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | Hostel Rent | 8.25 | | Repair & Maintenance Expenses | 2.12 |
| | | | | Audit Fees | 0.03 |
| | Donation | - | | Communication Expenses | 0.15 |
| | | | | Establishment Expenses | 4.80 |
| | | | | Other Expenses | 0.40 |
| | | | | Rent & Taxes | 0.25 |
| | | | | Furniture & Equipment's | 0.50 |
| | | | | | |
| | **Total** | 8.25 | | **Total** | 8.25 |

सूचक :- प्रि. डॉ. ए. सी. अत्तार
अनुमोदक :- मा. डॉ. व्ही. डी. जाधव
ठराव सर्वानुमते मंजूर :-

**विषय क्र. ३ :- कै. भूपाल अण्णा बहीशेट, व श्रीमती लीलावती व देवेंद्र बसप्पा दोड्ण्णावर यांच्या स्मरणार्थ देण्यात येणारे पारितोषिक हे महाविद्यालयात प्रत्येक विभागात प्रथम आलेल्या विद्यार्थी व विद्यार्थीनीस दिलेल्या पारितोषिकाबाबत माहिती देणे.**

**ठराव क्र. ३** :- रयत शिक्षण संस्थेच्या वतीने देण्यात येणारा कै. भूपाल अण्णा बहीशेट, व श्रीमती लीलावती व देवेंद्र बसप्पा दोड्ण्णावर यांच्या स्मरणार्थ देण्यात येणारे रोख रक्कम पारितोषिक व प्रमाणपत्र दि. ३०.१२.२०२२ रोजी वितरीत करणेत आले. याबाबतची माहिती मा. प्राचार्य यांनी सभेस दिली. सदर पारितोषिकासाठी मा. सुरेश बहीशेट यांनी रयत शिक्षण संस्थेच्या नावे रक्कम रू. १५,००,०००/- (पंधरा लाख रू. फक्त) कायम ठेव पावती स्वरुपात खात्यावर ठेवण्यात आली आहे. त्यातून मिळणाऱ्या व्याज रक्कमेतून महाविद्यालयातील विद्याशाखेतील प्रथम एका विद्यार्थ्याला व विद्यार्थिनीला देण्यात आली. याबाबत मा. सुरेश बहीशेट यांचे सभेने अभिनंदन केले.

**List of Rankers in Summer Semester Examination 2022**

| Sr. No. | Name of the Student | Branch | CGPA | Award Amount |
|---|---|---|---|---|
| 1 | Joshi Sourabh Pramod | Computer Engineering | 9.54 | 9500 |
| 2 | Ghadge Sachin Dattatray | Electronics Engineering | 9.47 | 9500 |
| 3 | Disale Dikshant Bhanudas | Mechanical Engineering | 9.29 | 9500 |
| 4 | Attar Mohasin Jakirahusen | Civil Engineering | 8.93 | 9500 |
| 5 | Kotibhaskar Arya Amod | Electronics Engineering | 9.54 | 9500 |
| 6 | Nikam Rutuja Satish | Mechanical Engineering | 9.41 | 9500 |
| 7 | Buva Shraddha Kedari | Civil Engineering | 9.32 | 9500 |
| 8 | Patil Prerana Sanjaykumar | Computer Engineering | 9.28 | 9500 |

**सूचक :- डॉ. ए. सी. अत्तार**
**अनुमोदक :- मा. श्री. प्रतापराव पवार**
**ठराव सर्वानुमते मंजूर :-**

**विषय क्र. ४ :- महाविद्यालयातील सेवकांनी रयत शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यालयासमोर करणेत आलेल्या आंदोलन व उपोषणानंतर महाविद्यालयात निर्माण झालेल्या विविध मुद्द्याबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. ४** :- आंदोलन व उपोषणानंतर महाविद्यालयात निर्माण झालेल्या विविध मुद्द्याबाबत मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली.

अ) महाविद्यालयातील प्रा. धनंजय भगवानदास देवी व प्रा. दिलीप संपत्ती आलदर यांनी काही शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे नेतृत्व करून अनेक मागण्या बाबत निवेदने महाविद्यालयाकडे दबाव आणण्याच्या उद्देशाने दिली आहेत. त्याच्या प्रती संस्थेलाही दिल्या आहेत. तसेच काही मागण्या थेट संस्थेस करून महाविद्यालय व संस्थेस वेठीस धरण्याचा प्रयत्न केला आहे.

दिनांक २८/१२/२०२२ रोजी प्रा. धनंजय भगवानदास देवी व प्रा. दिलीप संपत्ती आलदर यांच्या नेतृत्वाखाली काही शिक्षक व शिक्षकेत्तर कर्म-यांनी महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या दालनात विनापरवाना प्रवेश केला आणि त्यांना अपशब्द बोलून त्यांना अपमानास्पद वागणूक दिली आणि त्यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला.

पुन्हा दिनांक १०/०२/२०२३ रोजी प्रा. धनंजय भगवानदास देवी व प्रा. दिलीप संपत्ती आलदर यांच्या नेतृत्वाखाली ३० ते ३५ शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी प्राचार्यांच्या दालनात विनापरवाना गेले आणि हातवारे करून अपशब्द बोलून प्राचार्यांना अपमानास्पद वागणूक दिली त्यांचा उपमर्द केला त्यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला आणि त्यांना इथून निघून जावा अशा प्रकारची भाषा सुद्धा वापरली.

यापूर्वी सुद्धा प्रा. धनंजय भगवानदास देवी व प्रा. दिलीप संपत्ती आलदर यांनी महाविद्यालयाने दिलेल्या आदेशांचे उल्लंघन केलेले आहे. त्यांच्यावर सोपवलेले कामकाज विविध कारणे सांगून नाकारले आहे.

वरीलप्रमाणे प्रा. धनंजय भगवानदास देवी व प्रा. दिलीप संपत्ती आलदर यांनी मुद्दामपणे महाविद्यालयातील वातावरण गढूळ केले आहे. त्याचप्रमाणे त्यांनी प्राचार्य पदाचे अवमूल्यन केले आहे. त्यामुळे त्यांना महाविद्यालयाच्या सेवेत ठेवणे प्रशासकीय दृष्टीने अडचणीचे आहे. त्यामुळे त्यांची या महाविद्यालयातून कर्मवीर भाऊराव पाटील पॉलिटेक्निक वर्ये,सातारा या कॉलेजमध्ये प्रशासकीय करणास्तव बदली करण्यात यावी असे ठरले.

ब) प्रा. धनंजय भगवानदास देवी व प्रा. दिलीप संपत्ती आलदर यांनी वरील ठरावात नमूद केल्याप्रमाणे अक्षेपाहार्य वर्तन केले आहे. त्यामुळे महाविद्यालयातील कामकाजावर परिणाम झाला आहे त्यांच्याकडून गंभीर स्वरूपाचे गैरवर्तन झाल्याचे निदर्शनास आले असल्याने त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी व त्याचा खुलासा असमाधानकारक आल्यास व त्यांनी खुलासा न दिल्यास आणि त्यांच्या कामकाजात सुधारणा न झाल्यास त्यांना त्वरित निलंबित करण्यात यावे असे ठरले.

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

**सूचक :- प्रा. डॉ. एम. बी. कुमठेकर**
**अनुमोदक :- मा. श्री. उदय जाधव**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. ५ :- NBA कमिटी भेटीच्या अनुषंगाने महाविद्यालयात करावयाच्या कामकाजाबाबत.**

१. NBA कमिटी भेटीच्या तारखेबाबत व येणाऱ्या खर्चाबाबत चर्चा करणे.

२. NBA साठी जात असलेल्या महाविद्यालयातील तीन विभागामध्ये प्रत्येकी एक प्राध्यापक व दोन सहयोगी प्राध्यापक संस्था पातळीवर नियुक्ती करणेबाबत चर्चा करणे.

३. महाविद्यालयात कार्यरत असलेले शिक्षकेत्तर सेवक (कनिष्ट लिपिक व प्रयोगशाळा सहाय्यक) यांना ११ महिन्याची नेमणूक आदेश देणेबाबत चर्चा करणे.

४. NBA कडून NBA कमिटीच्या भेटीच्या तारखेबाबत आलेल्या स्मरणपत्राबाबत चर्चा करणे

**ठराव क्र. ५.** – १. NBA कमिटीची भेट दि. २३.१२.२०२२ ते २५.१२.२०२२ या कालावधीत होणार होती. परंतु कायम शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांच्या आंदोलनामुळे रद्द करणेत आली होती. महाविद्यालयासाठी NBA नामांकन मिळणे आवश्यक असल्यामुळे NBA कमिटीची पुढील तारीख घेणेबाबत मार्गदर्शन मिळावे. तसेच पुढील तारीख घेणेसाठी रक्कम रु. १,७७,०००/- (एक लाख सत्त्याहत्तर रु. फक्त) भरण्यास परवानगी मिळावी.

याबाबत मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. त्यानुसार NBA करणे अत्यंत आवश्यक आहे असे सन्मानीय सदस्य मा. डॉ. एम. बी. कुमठेकर व डॉ. डी. व्ही. जाधव सहाय्यक संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, विभागीय कार्यालय, पुणे यांनी व्यक्त केले. यावर सभेने NBA समिती भेटीबाबतच्या तारखा लवकरात लवकर ठरविणेसाठी सूचना केल्या, तसेच NBA समन्वय सौ. डॉ. मोदी एस. जे. यांनी NBA बाबत केलेल्या तयारीचा आढावा सभेस दिला. याबाबत सभेने समाधान व्यक्त केले व NBA समितीच्या भेटीची पुढील तारीख घेणेसाठी रक्कम रू. १,७७,०००/- भरणेस सभेने मंजुरी दिली.

२. NBA साठी जात असलेल्या महाविद्यालयातील तीन विभागामध्ये प्रत्येकी एक प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक संस्था पातळीवर नियुक्ती करणेबाबत चर्चा करणे. ( सिव्हील इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर सायन्स & इंजि., मेकॅनिकल इंजि.)

याबाबत मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. त्यानुसार सभेने सिव्हील इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर सायन्स & इंजि.व मेकॅनिकल इंजि. या तिन्ही विभागात महाविद्यालय स्तरावर माहिती घेवून पात्र असलेल्या उमेदवारांची संस्था स्तरावर नियुक्ती करणेस सभेने परवानगी दिली.

तसेच आवश्यकतेनुसार महाविद्यालयाच्या विविध विद्याशाखेत सहाय्यक प्राध्यापक (Assistant Professor) सेवकांची हंगामी (ADHOC) स्वरुपात नियुक्ती करणेस परवानगी दिली.

३. नियमानुसार महाविद्यालयातील शिक्षकेत्तर सेवकांची संख्या कमी आहे. महाविद्यालयास शिक्षके सेवकांची एकूण ८५ पदे आवश्यक आहेत. यापैकी सध्या २६ पूर्णवेळ कायम शिक्षकेत्तर सेवक कार्य आहेत. रिक्त असणारी शिक्षकेत्तर सेवकांची पदे रोजंदारी तत्त्वावर आवश्यकतेनुसार दरवर्षी भरत आहोत सदर रोजंदारी सेवकांना महाविद्यालयातील हजेरी पत्रकावर घेता येत नाही व त्यांच्या मानधनावर होणा खर्च शुल्क नियामक प्राधिकरण (FRA) ग्राहय धरत नाही. तसेच NBA कमिटीला शिक्षकेत्तर सेवकां माहिती सादर करणेसाठी महाविद्यालयास अडचणी निर्माण होत आहेत. सध्या कार्यरत असलेले व रि असलेल्या जागेनुसार रोजंदारी सेवकांना (कनिष्ट लिपिक व प्रयोगशाळा सहाय्यक) किमान ११ महिन्या नेमणूक आदेश देणेविषयी चर्चा करणे. याबाबत मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली.

त्यानुसार सभेने महाविद्यालयाच्या स्तरावर मुलाखती घेऊन अकरा महिन्याचे संस्था स्तरावर नेमणू आदेश देण्यास मंजुरी दिली.

४. महाविद्यालयाचे NBA करिता पात्र अभ्यासक्रमांना एनबीए मुल्यांकन पुढील सहा महिन्यात प्राप्त करू घेणे अनिवार्य आहे. अन्यथा शासनानुसार कार्यवाही करणेत येईल असे कळविणेत आले आहे. तसेच NB , AICTE च्या संकेतस्थळावरून या महाविद्यालयास स्मरणपत्र दोन वेळा आलेले असून पुढील आठ दिवसा एनबीए समितीची भेट घेणेसाठी पाच तारखा कळविणेबाबत सूचित केलेले आहे. जेणेकरून माहे मे २० पर्यंत एनबीए समिती भेट देवू शकेल. परंतु विभागातील काही कायम शिक्षक सेवकांनी सदर कामका करणेस नकार दर्शविलेला आहे. तरी सदरची बाब अतिशय गंभीर स्वरुपाची असून याबाबत संस्थ स्तरावरून योग्य कार्यवाही करणेत यावी. याबाबत सभेने चर्चा करून योग्य ते मार्गदर्शन देण्यात यावे.

वरील विषयास अनुसरून मा. प्राचार्य यांनी NBA कामकाजबाबत सभेस सविस्तर माहिती दिली. याबाब सभेने NBA समितीच्या भेटीची तारीख लवकरात लवकर घ्यावी असे सूचित केले. NBA ची तया करणेसाठी सेवकांना लेखी आदेश पारित करावेत व त्यानुसार कामकाज न झाल्यास सेवकाकडून त्याच खुलासा मागवावा व NBA कामकाज पूर्ण क्षमतेने करण्यात यावे असे सभेने सूचित केले.

**सूचक :- प्रा. डॉ. एम. बी. कुमठेकर**
**अनुमोदक :- मा. श्री. उदय जाधव**
**ठराव सर्वानुमते मंजूर :-**

**विषय क्र. ६ - प्रा. शेलार ए. बी. व डॉ. तपासे ए. बी. यांनी मा. सचिव रयत शिक्षण संस्था सातारा यांना पाठविणेत आलेल्या ईमेल व पत्राबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. ६** – श्रीराम विद्यालय पिंपळगाव, खडकी, ता. आंबेगाव, जि. पुणे या नवीन इमारत बांधकामाची तपासणी करणेसाठी मा. सचिव, रयत शिक्षण संस्था सातारा यांच्या कडील पत्राद्वारे कळविणेत आले होते. त्यानुसार महाविद्यालयातील प्रा. शेलार ए. बी. व डॉ. तपासे ए. बी. यांना मा. प्राचार्य यांच्या समवेत जाण्याबाबत कार्यालयीन आदेशाद्वारे कळविणेत आले . परंतु प्रा. शेलार व डॉ. तपासे यांनी दि. ३१.१२.२०२२ रोजी च्या ईमेल नुसार मा. प्राचार्य यांच्या सोबत इमारत बांधकाम तपासणीचे कामकाज करणार नाही याबाबत मा. सचिव रयत शिक्षण संस्था सातारा यांना परस्पर ईमेल द्वारे कळविले. याबाबत सभेने चर्चा करून मार्गदर्शन करावे.

वरील विषयाबाबत मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. त्यानुसार सभेने दि. ३१.१२.२०२२ रोजी च्या ईमेलची दखल गांभीर्याने घेतली प्रा. शेलार व डॉ. तपासे यांनी स्वतंत्ररित्या पाठविलेला अहवाल स्वीकारला जाणार नाही असे रयत शिक्षण संस्थेचे मा. सचिव यांनी सांगितले. संबधित सेवकांना याबाबत पत्र देऊन खुलासा घेण्यात यावा असे सभेने सुचविले.

**सूचक :- प्रिं. डॉ. विठ्ठल शिवणकर**
**अनुमोदक :- मा. श्री. उदय जाधव**
**ठराव सर्वानुमते मंजूर :-**

**विषय क्र. ७ - कायम शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांनी केलेल्या विविध मागणी अर्जाबाबत.**

**ठराव क्र. ७ – महाविद्यालयातील कायम शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांनी खालीलप्रमाणे विविध मागणी साठी अर्ज सादर केलेले आहेत. याबाबत चर्चा करून मार्गदर्शन मिळावे.**

१. महाविद्यालयातील कायम सहाय्यक प्राध्यापक शिक्षक सेवकांना CAS अंतर्गत AGP बदल मिळणेबाब अर्ज केलेले होते त्यानुसार महाविद्यालयाची नियामंक मंडळ सभा क्र. ०५, दि. ०९.०५.२०२२ रोजी मधी ठराव क्र. १५ (ड) नुसार सदर CAS नुसार बढती करणेसाठी विद्यापीठ नियमानुसार समिती गठीत करू योग्य ती पुढील कार्यवाही करणेस सभेने परवानगी दिली होती. त्यानुसार कमिटी गठीत करून CA अंतर्गत AGP बदलण्यासाठी अहवाल तयार करण्यात आलेला आहे. त्या अहवालानुसार CAS अंतर्ग AGP बदलण्यास सभेची परवानगी मिळावी. याबाबत मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. त्यानुसा सभेने चर्चा करून महाविद्यालयातील कायम सहाय्यक प्राध्यापक शिक्षक सेवकांना CAS अंतर्गत AG बदल करणेस मंजुरी दिली व मागील फरक न देता चालू महिन्यापासून देण्यास परवानगी दिली.

२. **एम. ई., एम.टेक / पीएच.डी पदवी संपादन केलेल्या शिक्षक सेवकांच्या वेतन वाढीच्या (Incremen अर्जाबाबत चर्चा करणे.**

महाविद्यालयातील एम.ई./एम.टेक आणि पीएच. डी पदवी धारण केलेल्या कायम सहाय्यक प्राध्यापकां एम.ई./एम.टेक पदवी पूर्ण केल्यानंतर एक **One Non Compounded Increment** व पीएच.डी. पद धारण केल्यानंतर **Three Non Compounded Increment** देण्याची AICTE च्या दि. ०४.०१.२०१६ च **Notification** नुसार व सहाव्या वेतन आयोगाच्या दि. २०.०८.२०१० च्या महाराष्ट्र शासन निर्णयानुसा सदर Increment देण्याबाबत सूचना आहेत. सेवेमध्ये कार्यरत असताना सहाव्या वेतन आयोगानुसा सहाय्यक प्राध्यापकाचे शैक्षणिक अर्हता नियमाने एम.ई./एम.टेक असणे आवश्यक आहे. तसेच महारा शासन निर्णय दि. ०३.०६.२०२२ नुसार एम.ई./एम.टेक व पीएच.डी धारण केलेल्या सहाय्यक प्राध्याप यांची वेतनश्रेणी PB -3 (**Rs.** 15600-39100) असेल तर सदर सेवकांना Increment देय आहे.
परंतु ज्या सेवकांची वेतनश्रेणी **PB -4(Rs.** 37400-67000) असेल तर त्यांना Increment लागू होत ना असे दिसून येते. तरी वरीलनुसार एम. ई., एम.टेक / पीएच.डी पदवी धारण केलेल्या सेवकांना Incremen देणेबाबत सभेने चर्चा करून योग्य तो निर्णय देण्यात यावा.

वरील विषय संदर्भात सभेने सहाय्यक प्राध्यापक पदावर काम करीत असणाऱ्या एम.ई./एम.टेक पीएच.डी धारण केलेल्या प्राध्यापकांना नियमानुसार मागील फरक न देता चालू महिन्यापासून वेतन वा देण्यास परवानगी दिली.

३. **महाविद्यालयात प्राप्त झालेल्या वेतनवाढ फरकाच्या अर्जाबाबत चर्चा करणे.**

a. डॉ . आलदर डी.एस. यांना सहयोगी प्राध्यापक पदाची वेतनश्रेणी रयत शिक्षण संस्था सातारा यांच्या मान्यतेनुसार माहे नोव्हेंबर २०२२ पासून लागू करणेत आलेली आहे. परंतु डॉ. आलदर यांनी माहे ऑगस्ट २०१५ पासून ते माहे ऑक्टोबर २०२२ पर्यंत चा वेतनाचा फरक रक्कम रु. २९.४ लक्ष मिळणेबाबत अर्ज व वेतन फरकाचा तक्ता सादर केलेला आहे. तरी याबाबत सभेने चर्च करून मार्गदर्शन करावे.

b. प्रा. देवी धनंजय भगवानदास यांची सहयोगी प्राध्यापक पदाची वेतनश्रेणी बाबत रयत शिक्षण संस्था सातारा यांच्या मान्यतेनुसार ऑगस्ट २०११ ते डिसेंबर २०२२ अखेरपर्यंतच्या एम.टेक आगाऊ वेतनवाढ वेतन फरक रक्कम रु. २२.८४ लक्ष ही रक्कम माहे फेब्रुवारी २०२३ च्या वेतनातून मिळावी यासाठी अर्ज व वेतन फरकाचा तक्ता सादर केलेला आहे. तरी याबाबत सभेने चर्चा करून योग्य ते मार्गदर्शन करावे.

**वरील A व B मुद्द्यानुसार डॉ. आलदर डी. एस. व प्रा. देवी डी. बी. यांनी सादर केलेल्या वेतनवाढ फरकाच्या अर्जाबाबत मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली व याबाबत सभेने फरक देण्यात येऊ नये असे सूचित केले.**

**४. प्रा. पिसाळ ए. बी. यांच्या वेतन वाढीबाबत.**

सहाव्या वेतन आयोगानुसार सहाय्यक प्राध्यापकाची कमाल शैक्षणिक अर्हता एम. ई. / एम.टेक असणे आवश्यक आहे. प्रा. पिसाळ ए बी. यांची शैक्षणिक अर्हता बी.ई. मेकॅनिकल इंजि. असल्याने AICTE व NBA च्या संकेतस्थळावर सदर शिक्षक सेवकाची माहिती ग्राह्य धरली जात नाही. त्यामुळे प्रा. पिसाळ यांची शैक्षणिक अर्हता पूर्ण करेपर्यंत वार्षिक वेतन वाढ स्थगित करणेत आलेली आहे. परंतु प्रा. पिसाळ यांनी दि. ३०.१२.२०२२ रोजीच्या अर्जानुसार स्थगित वेतनवाढ नियमित पणे देणेबाबत अर्ज सादर केलेला आहे. सध्या त्यांना सहयोगी प्राध्यापक ३७४००-६७००० या वेतन श्रेणीमध्ये वेतन अदा करणेत येत आहे. याबाबत सभेने चर्चा करून योग्य ते मार्गदर्शन करावे.

वरील विषयानुसार मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली व सभेने प्रा. पिसाळ ए बी. यांची वेतनवाढ शैक्षणिक अर्हता पूर्ण करेपर्यंत स्थगित ठेवण्यात यावी असे सुचविले.

**५. कायम शिक्षकेत्तर सेवकांना नियमानुसार पदोन्नती मिळणेबाबत.**

महाविद्यालयातील कायम शिक्षकेत्तर सेवकांनी पदोन्नती मिळणेबाबत अर्ज सादर केलेला आहे. तरी सदर सेवकांना पदोन्नती देणेबाबत सभेचे मार्गदर्शन मिळावे. याबाबत मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. त्यानुसार सभेने कायम शिक्षकेत्तर सेवकांना नियमानुसार पदोन्नती देण्याबाबत तूर्तास स्थगिती देण्यात आली असून सदर पदोन्नती बाबत निर्णय स्थगित ठेवण्यात आला आहे.

**६. सध्या कार्यरत असलेले कायम शिक्षकेत्तर सेवकांना ०८ ऐवजी १२ किरकोळ रजा लागू करणेबाबत.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड यांच्या नियमानुसार शिक्षकेत्तर सेवकांना एका शैक्षणिक वर्षामध्ये १२ किरकोळ रजेची शिफारस देण्यात आली आहे. परंतु महाराष्ट्र शासनाकडे त्याची अंमलबजावणी झालेली नाही. तरी याबाबत सभेने मार्गदर्शन करावे. सदर मुद्याची माहिती मा. प्राचार्य यांनी सभेस दिली.

यावर सभेने चर्चा करून कायम शिक्षकेत्तर सेवकांना विद्यापीठाच्या नियमानुसार ०८ ऐवजी एकूण १२ किरकोळ रजा लागू करणेस मंजुरी दिली.

**सूचक :- डॉ. सौ. माने एस. व्ही.**
**अनुमोदक :- प्रा. डॉ. एम. बी. कुमठेकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर :-**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी सातारा

**विषय क्र. ८ —** **Dean Administration व Controller of Examination यांनी तडकाफडकी दिलेले राजीनामाबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. ८ —** महाविद्यालयात प्रशासकीय कामकाज करणेसाठी नियामक मंडळाची परवानगी घेऊन Dean Administration या पदावर डॉ. मोदी शबिना जमीर यांची अंतर्गत नियुक्ती करून कार्यभार देण्यात आला होता सदरचा कार्यभार डॉ. मोदी यांनी स्वीकारला होता. तसेच Controller of Examination या पदावर प्रा. माळवदे निकेत विष्णू यांना देण्यात आला होता. सदरचा कार्यभार त्यांनी स्वीकारला होता. परंतु आंदोलनानंतर अचानक तडकाफडकी राजीनामा दिलेला आहे. सदरचे राजीनामे प्रशासनाने स्वीकारले नाहीत.

परंतु प्रा. माळवदे हे सदरच्या पदाची जबाबदारी व कामकाज करणेस टाळाटाळ करत असून याबाबत वारंवार पत्रव्यवहार करून वरिष्टांच्या आदेशाचे पालन करीत नाहीत. यामुळे महाविद्यालयातील प्रशासकीय शैक्षणिक व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. तरी याबाबत सभेने चर्चा करून मार्गदर्शन करावे.

वरील विषयाबाबत महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. त्यास सभेने चर्चा करून ज्या सेवकांना काम करण्याची व जबाबदारीची जाणीव आहे अशा सेवकांना कामकाज देण्यात येणे असे सुचविले. तसेच प्रा. माळवदे यांच्या दि. १२.०२.२०२३ रोजीच्या अर्जामधील मुद्दा क्र. ०१ हा अमान्य करणेत आला आहे व मुद्दा क्र. ०२ मध्ये नमूद केल्यानुसार प्रा. माळवदे यांच्या घरगुती व वैयक्तिक अडचणीच्या कारणास्तव त्यांच्या मागणीनुसार परीक्षा नियंत्रक या पदाचा राजीनामा मंजूर करणेत यावा असे ठरले.

तसेच डॉ. मोदी एस. जे. यांनी Dean Administration या पदाचा राजीनामा दिला होता परंतु त्यांनी या पदावर काम करण्याची तयारी दर्शविल्याने अमान्य करणेत यावा असे ठरले.

**सूचक :- प्रा. डॉ. एम. बी. कुमठेकर**
**अनुमोदक :- मा. श्री. प्रतापराव पवार**
**ठराव सर्वानुमते मंजूर :-**

**विषय क्र. ९ — महाविद्यालयातील खरेदी समिती बाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. ९ —** महाविद्यालयात विविध विभागामध्ये साहित्य खरेदी करणेत येत असते. खरेदी समिती सदस्यांबाबत चर्चा करणे.

**सध्या महाविद्यालयात कार्यरत असलेली खरेदी समिती खालीलप्रमाणे —**

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | मा. डॉ. ए. सी. अत्तार | चेअरमन |
| २. | मा. धैर्यशिल भोसले | सदस्य |
| ३. | प्रा. सौ. घाटगे दिपाली | सदस्य |
| ४. | प्रबंधक | सदस्य |
| ५. | संबधित विभागप्रमुख | सदस्य / सचिव |

वरील समितीमधील श्री. धैर्यशिल भोसले याच्या नावाला आंदोलन कर्त्यांचा आक्षेप आहे. तरी याबाबत सभेने चर्चा करून मार्गदर्शन करावे.

याबाबत महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांनी खरेदी समिती बाबत सभेस माहिती दिली त्यानुसार सभेने चर्चा करून महाविद्यालयाच्या नियामक मंडळाच्या सर्व सन्मानीय सदस्य यांची कोणतीही तक्रार नसल्याने खरेदी समिती आहे त्याच प्रमाणे सुरु ठेवून खरेदी बाबतचे कामकाच करणेस सुचविले. महाविद्यालयाच्या नियामक मंडळाचे सदस्य व शिक्षक प्रतिनिधी म्हणून डॉ. सौ. माने सुनिता व्ही. यांना सदस्य म्हणून समिती मध्ये घेण्यात यावे. तसेच संबधित विभागाची खरेदी प्रक्रिया असल्यास संबधित विभागप्रमुख यांचा समावेश करावा.

**सूचक :- प्रिं. डॉ. विठ्ठल शिवणकर**
**अनुमोदक :- प्रा. डॉ. एम. बी. कुमठेकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर :-**

**विषय क्र. १० — महाविद्यालयात कायदेशीर अडचणी व समस्या निर्माण होत असतात त्याकरिता स्वतंत्र कायदा तज्ञ यांची नियुक्ती करणेसाठी परवानगी मिळावी.**

**ठराव क्र. १०. —** महाविद्यालयात वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या कायदेशीर अडचणी व समस्या यांना समोरे जाणेकरिता व कायदेशीर प्रतीउत्तर देणेकरिता महाविद्यालयाच्या स्तरावर कायदेशीर तज्ञ यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. याबाबत सभेने चर्चा करून मार्गदर्शन करावे.

सदर विषयाबाबत मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली त्यानुसार सभेने माहितगार व कायदेशीरतज्ञ व्यक्तीची महाविद्यालय स्तरावर नियुक्ती करणेस व त्यास योग्य ते मानधन देण्यास परवानगी दिली.

**सूचक :- मा. श्री. उदय जाधव**
**अनुमोदक :- मा. डॉ. डी. व्ही. जाधव**
**ठराव सर्वानुमते मंजूर :-**

**विषय क्र. ११ — महाविद्यालयातील चतुर्थश्रेणी सेवकांना सन २०१२-१३ पासून ते सेवानिवृत्त कालावधी भोगलेल्या अर्जित रजेमधून रजा खातेवर शिल्लक असलेल्या रजेचे रजा रोखीकरण प्रस्तावास मंजुरी मिळणे.**

**ठराव क्र. ११** — महाविद्यालयातील चतुर्थश्रेणी सेवकांना देणेत येणा-या रजारोखीकरणाच्या प्रस्तावाबाबत रयत शिक्षण संस्थेच्या ऑडिट विभागात झालेल्या चर्चेनुसार चतुर्थश्रेणी पद हे Non Vacational पद असल्याने सदर चतुर्थश्रेणी पदाला Vacation नियमानुसार देता येत नाही. तरी महाविद्यालयातील चतुर्थश्रेणी सेवकांना सन २०१२-१३ पासून Vacation दिलेले नाहीत. त्यानुसार महाविद्यालयातील चतुर्थश्रेणी सेवक सेवानिवृत्त झालेनंतर सन २०१२-१३ पासून ते सेवानिवृत्त कालावधीत अर्जित रजा भोगलेल्या रजेपैकी शिल्लक असलेल्या अर्जित रजेवर रजारोखीकरण प्रस्तावास मान्यता मिळावी.

याबाबत मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. सभेने याबाबत चर्चा करून महाविद्यालयातील चतुर्थश्रेणी सेवकांना सेवापुस्तकातील अर्जित रजेच्या नोंदीनुसार व नियमानुसार चतुर्थश्रेणी सेवकांना सन २०१२-१३ पासून ते सेवानिवृत्त कालावधीत अर्जित रजा भोगलेल्या रजेपैकी शिल्लक असलेल्या अर्जित रजेवर रजारोखीकरणाच्या प्रस्तावास परवानगी दिली.

**सूचक :- सौ. डॉ. माने एस. व्ही.**
**अनुमोदक :- प्रि. डॉ. विठ्ठल शिवणकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर :-**

**विषय क्र. १२ — महाविद्यालयातील इलेक्ट्रिकल मेंटेनन्स बाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. १२** — महाविद्यालयातील इलेक्ट्रिकल मेंटेनन्स विभागात कार्यरत असलेले श्री. सूर्यवंशी व्ही. एम. दि. ३०.०४.२०२३ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. त्यामुळे महाविद्यालयातील स[illegible] विभागातील व परिसरातील विद्युत उपकरणाची देखभाल करणे करिता नवीन वायरमन कि[illegible] इलेक्ट्रिकल क्षेत्रातील सेवक नियुक्त करावा लागेल, किवां इलेक्ट्रिकल मेंटेनन्स करार तत्वा[illegible] एखाद्या एजन्सीला देणेबाबत मार्गदर्शन मिळावे.

याबाबत मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. महाविद्यालयाचे विद्युत उपकरणाची कामे [illegible] जबाबदारीची व जिकिरीची असल्याने याबाबत पूर्ण पणे माहितीचा सेवक किवां इलेक्ट्रिकल मेंटेन[illegible] एजन्सी ठरविणे अत्यंत आवश्यक आहे. त्यानुसार सभेने चर्चा करून महाविद्यालयातील विद्यु[illegible] उपकरणाचा व इलेक्ट्रिकल मेंटेनन्स या विभागातील कामकाज करणेसाठी इलेक्ट्रिकल मेंटेनन्स कर[illegible] तत्वावर नामवंत एजन्सीला कामकाज देण्याबाबत सभेने सूचना दिल्या व एजन्सी नेमण्यास परवान[illegible] दिली.

**सूचक :- मा. उदय जाधव**
**अनुमोदक :- मा. प्रतापराव पवार**
**ठराव सर्वानुमते मंजूर :-**



कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी ... सातारा

**विषय क्र. १३ — महाविद्यालयातील विविध विभागातील कामकाजाकरिता टेन्डर मागविली आहेत त्याची माहिती देणे.**

**ठराव क्र.** :- सदर हे MKCLच्या Online Portal द्वारे निविदा मागविणेत आलेले होते. त्यानुसार मागविलेले निविदा दि.११.११.२०२२ रोजी रयत शिक्षक संस्थेच्या खरेदी समिती मार्फत सदर निविदा उघडण्यात आलेल्या आहेत. सदर सभेमध्ये खालील निविदा बाबत चर्चा झाली असता, आलेल्या निविदा पैकी खालील रकमेप्रमाणे निविदांना कामकाज देणेत आले.

| अ.क्र. | निविदाचे नाव | निश्चित झालेले रक्कम |
|---|---|---|
| ०१. | Construction of Water Tank | ४,५०,०००/-(चार लाख पन्नास हजार रू.) |
| ०२. | Renovation of Capgemini Digital Academy Center | ५,००,०००,/- (पाच लाख रू. ) |
| ०३. | Modernization of Auditorium | १९,७५,०००/- (एकोणीस लाख पंच्याहत्तर रू.) (Excluding Sound System & AC) |
| ०४. | Installation of Lift | एकही निविदा आले नसल्याने परत निविदा मागविणेत येणार आहेत. |
| ०५. | Installation of Shaft of Lift | एकही निविदा आले नसल्याने परत निविदा मागविणेत येणार आहेत. |

वरील चार निविदा रयत शिक्षण संस्थेच्या खरेदी समिती नुसार निश्चित झालेअसून सदर कामकाज करणेसाठी होणाऱ्या खर्चास सभेचे मंजुरी मिळणेसाठी मा. प्राचार्य यांनी सभेस वरील निविदाची माहिती दिली. त्यानुसार चर्चा कर करून सभेने वरील तक्त्यातील अ.क्र. १, २ व ३ च्या निविदाचे कामकाज करणेस परवानगी देण्यात आली असून सदर कामकाज करणेसाठी येणाऱ्या एकूण ४,५०,०००+५,००,०००+१९,७५,०००=२९२५०००/- खर्चास मंजुरी दिली.

तसेच ११.११.२०२२ च्या खरेदी समितीच्या मिटिंगमध्ये ठरल्यानुसार **Sound System, AC** व इतर साहित्य महाविद्यालय स्तरावर कोटेशन मागवून खरेदी करण्यास सभेने परवानगी दिली.

**सूचक :- प्रा. डॉ. एम. बी. कुमठेकर**
**अनुमोदक :- मा. श्री. उदय जाधव**
**ठराव सर्वानुमते मंजूर :-**

**विषय क्र. १४ - महाविद्यालयातील प्रशासकीय व आर्थिक बाबीविषयी मंजुरी घेणे.**

**विषय क्र. १४.०१ - पी.एफ. चा दंड भरणेस परवानगी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. १४.०१.** – भविष्य निर्वाह निधी कार्यालय कोल्हापूर यांच्या कडून महाविद्यालयाला मार्च २०१० ते जु २०२१ या कालावधीसाठी रु. २१,१६,०२३ /- इतकी रक्कम दंड व दंड व्याज भरणे संबधी नोटी आलेली आहे. उपरोक्त रक्कमेपैकी रु. १३,५४,८११/- इतकी रक्कम डिग्री विभागाची असून उर्वरि रक्कम रु. ७,६१,२१२/- हि रक्कम डिप्लोमा विभागाची आहे. डिग्री व डिप्लोमा विभागाचे पी.एफ. खा मार्च २०२० पर्यंत एकत्रित होते. डिप्लोमा विभागाची रक्कम रु. ७,६१,२१२/- ची मागणी डिप्लो विभागाला केलेली आहे. सदर रक्कम डिप्लोमा विभागाकडून प्राप्त झालेनंतर डिग्री व डिप्लो विभागाची एकूण रक्कम रु. २१,१६,०२३/- इतकी रक्कम भरणे साठी परवानगी मिळावी.

याबाबत मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. सभेने याबाबत चर्चा करून महाविद्यालयाची आर्थि परस्थिती व दरमहा वेतन अदा केले जात नसल्याने सदरचा दंड हा भविष्य निर्वाह निधी कार्यालय कोल्हापूर यांना वेळोवेळी अदा केला नसल्याने दंड व दंड व्याजाची रक्कम PF कार्यालयाकडून देण्या आली आहे. त्याअनुषंगाने उपरोक्त दंड व दंड व्याज हा डिग्री व डिप्लोमा या दोन्ही विभागाची एकू रक्कम रु. २१,१६,०२३/- इतकी रक्कम भरणे साठी सभेने परवानगी दिली.

**विषय क्र. १४.०२ - NBA कमिटीच्या अनुषंगाने विविध विभागातील कामकाजासाठी येणाऱ्या खर्चास परवानगी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. १४.०२.** - १. NBA कमिटीच्या अनुषंगाने महाविद्यालयातील तसेच विविध विभागामधील दुरुस्ती व डागडुजी करणेसाठी अंदाजे १०,००,०००/-(दहा लाख रु. ) ऐवढा खर्च अपेक्षित आहे. याबाबत करण्या येणाऱ्या कामाची माहिती पुढीलप्रमाणे इमारत दुरस्ती, खिडक्या, दरवाजे दुरुस्ती, ग्रंथालयचा दरवाजाचं जागा बदलून नवीन दरवजा बसवणे, वर्गातील फॅन, ट्यूब लाईट, प्रयोगशाळेतील दुरुस्ती, वॉटर कुलर बसवणे, महाविद्यालयातील विद्युत विभागातील दुरस्ती, टॉयलेट मधील दुरुस्ती, रंगरंगोटी इत्यादी बाबी. याबाबत मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. सदर कामकाज हे NBA कमिटीच्या अनुषंगाने आवश्यक असल्याने सदरचे कामकाज करणेस व येणाऱ्या अंदाजे एकूण १०,००,०००/- खर्चास सभेने परवानगी दिली.

२. NBA कमिटीच्या अनुषंगाने येणारा प्रवास खर्च, जेवणाचा, नाष्टा व इतर खर्च अंदाजे १,२५,०००/- (एक लाख पंचवीस हजार रु. ) ऐवढा खर्च अपेक्षित आहे. याबाबत सभेने चर्चा करून महाविद्यालयात येणाऱ्या NBA कमिटी साठी वरील नुसार अंदाजे एकूण १,२५,०००/- रु. खर्च करणेस परवानगी दिली.

**विषय क्र. १४.०३ - महाविद्यालयातील प्लंबिंग चे काम करणेत आलेल्या खर्चास परवानगी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. १४.०३** — महाविद्यालयात NBA कमिटी दि. २३.१२.२०२२ ते दि .२५.१२.२०२२ या कालावधीत भेट देण्यास येणार होती त्यामुळे महाविद्यालयात विविध विभागातील दुरूस्तीचे कामकाज करणेत आले होते. त्यानुसार महाविद्यालयाच्या कार्यालयातील असणारे स्वच्छता गृहातील दुरूस्तीचे कामकाज करणेत आले आहे सदर .कामकाजासाठी व साहित्य खरेदी करणेसाठी ३२,११२/- खर्च झालेला आहे. तरी सदर खर्चास सभेची कार्योत्तर परवानगी मिळावी. याबाबत सभेने चर्चा करून NBA कमिटीच्या भेटीसाठी केलेल्या स्वच्छता गृहातील दुरूस्तीच्या कामकाजासाठी आलेल्या एकूण ३२,११२/- खर्चास सभेने कार्योत्तर परवानगी दिली.

**विषय क्र. १४.०४ - मुलींच्या वसतीगृहामध्ये नवीन पिण्याच्या पाण्याचा कुलर खरेदी करणेस परवानगी मिळावी.**

**ठराव क्र. १४.०४** — मुलींच्या वसतीगृहामधील पिण्याच्या पाण्याचा कुलर खराब झाला असून नवीन कुलर खरेदी करणे आवश्यक आहे. त्याकरिता अंदाजे ४००००/- रु. खर्च अपेक्षित आहे. तरी मुलींच्या वसतीगृहासाठी नवीन पिण्याच्या पाण्याचा कुलर खरेदी करणेसाठी सभेची परवानगी मिळावी.

वरील विषयानुसार मुलींच्या वसतीगृहासाठी नवीन पिण्याच्या पाण्याचा कुलर खरेदी करणेसाठी सभेने परवानगी दिली.

**विषय क्र. १४.०५ - कायम शिक्षकेत्तर सेवकांनी १२ वर्ष कालबद्ध पदोन्नती फरकाच्या रक्कमेस परवानगी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. १४.०५** — महाविद्यालयातील कायम शिक्षकेत्तर सेवकांना माहे सप्टेंबर २०२२ पासून संस्था मंजुरी नुसार १२ वर्ष कालबद्ध पदोन्नती लागू करणेत आलेली आहे. तरी फरकाची रक्कम देणेबाबत संस्था कार्यालयाने महाविद्यालयाच्या स्तरावर कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संस्था कार्यालयाकडे पाठविणेचे कळविले आहे. त्यानुसार सदर सेवकांना १२ वर्ष पूर्ण झालेल्या तारखेपासून ते ऑगस्ट २०२२ या कालावधीच्या फरकाची रक्कम रु. १५,६९,९४४/- अदा करण्यास परवानगी मिळावी.

याबाबत महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली, सभेने चर्चा करून ज्या सेवकांना मा. सहसचिव, रयत शिक्षण संस्था सातारा यांच्या कडील जावक क्र. उ.शि. ९४७२, दि. ०३.०९.२०२२ पत्राने कालबद्ध पदोन्नती मंजूर करणेत आली आहे, अशा सेवकांना फरकाची रक्कम अदा करणेस परवानगी देण्यात आली.

**विषय क्र. १४.०६ - IT Cell विभागातील विविध परीक्षेमध्ये काम करत असलेल्या सेवकांच्या मानधनाबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. १४.०६. :-** महाविद्यालयामध्ये IT Cell विभागात महाराष्ट्र शासनामार्फत व इतर कंपनी मार्फत विविध ऑनलाईन परीक्षा घेतल्या जातात. त्यानुसार सदर विभागात काम करत असलेल्या सेवकांना मानधन महाविद्यालयाच्या निर्णयानुसार दिले गेले आहे. तसेच IT Cell साठी गुंतवणूकचा परतावा जुलै २०२१ पर्यंत झालेला आहे. सध्या IT विभागात केलेल्या खर्चानुसार महाविद्यालय फायद्यात असल्याचे दिसून येते. तरी विविध कंपनी कडून मिळणारे मानधन हे इतर खर्च वगळता दि. ०१ जुलै २०२२ पासून देण्यात यावे.

याबाबत महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. सभेने चर्चा करून खालील तक्त्यानुसार मानधन अदा करणेस परवानगी दिली.

**देण्यात येणारे मानधनचा तक्ता खालीलप्रमाणे-**

| Sr. No. | Personal / Faculty | Charges for | | |
|---|---|---|---|---|
| | | Session 1 | Session 2 | Session 3/4 |
| 01 | Test Center Admin | 800 | 1000 | 1200 |
| 02 | IT Support / IT Manager / IT Admin | 650 | 850 | 1000 |
| 03 | Invigilator | 300 | 550 | 700 |
| 04 | Support Staff (All Type) | 250 | 400 | 450 |
| 05 | Electrician | 250 | 500 | 500 |
| 06 | Accountant | 300 | 400 | 500 |

**विषय क्र. १४.०७ - वर्कशॉप मधील रोजंदारी तत्वावर काम करीत असलेल्या सेवकांच्या मानधनाबाबत.**

**ठराव क्र. १४.०७** — महाविद्यालयाच्या वर्कशॉप मध्ये रोजंदारी तत्वावर काम करत असलेले वेल्डर यांच्या मानधनावाढी संदर्भात विभागप्रमुख व कार्यशाळा अधीक्षक यांनी सादर केलेल्या शिफारशी नुसार त्यांना १७,०००/- रु. इतके मानधन देणेसंदर्भात सुचविले आहे. याबाबत मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. सभेने चर्चा करून सदर सेवकाला महाविद्यालयाचे इतर कामकाज देण्यात यावे असे सुचविले. त्यानुसार सभेने दरमहा १७,०००/- रु. मानधन अदा करणेस परवानगी दिली.

**विषय क्र. १४.०८ - कु. आशितोष राजेंद्र शिंदे या विद्यार्थ्याने शिष्यवृत्ती मिळणेबाबत केलेल्या अर्जाबाबत.**

**ठराव क्र. १४.०८** — कु. आशितोष राजेंद्र शिंदे हा विद्यार्थी तृतीय वर्ष इलेक्ट्रॉनिक्स या विभागात शिकत आहे. सदर विद्यार्थ्याची आर्थिक परीस्थिती नाजूक असल्याने तसेच सदर विद्यार्थी महाविद्यालयाच्या वेळेनंतर DMART सातारा येथे अर्धवेळ ०५.३० ते १०.३० या वेळेत काम करत आहे. तरी सदर विद्यार्थ्याने रु. ३०,०००/- इतकी कर्मवीर शिष्यवृत्ती मिळणेबाबत अर्ज सादर केलेला आहे. सभेची परवानगी मिळावी. याबाबत प्राचार्य यांनी सभेस माहिती देऊन सदर सभेने कु. शिंदे या विद्यार्थ्याची आर्थिक परिस्थितीचा विचार करून कर्मवीर शिष्यवृत्ती देणे बाबत परवानगी दिली.

**विषय क्र. १४.०९ - कु. शुभम बी. भिंगवडे या विद्यार्थ्याच्या शैक्षणिक फी माफ करून शाळा सोडल्याचा दाखला मिळणेबाबत सादर केलेल्या अर्जाबाबत.**

**ठराव क्र. १४.०९** - :- सदर विद्यार्थ्याने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रथम वर्ष पदवी विभागात प्रवेश घेतला होता. परंतु प्रथम वर्ष पूर्ण झाल्यानंतर शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेला नाही. तरी सदर विद्यार्थ्याने शैक्षणिक फी माफ करून शाळा सोडल्याचा दाखला मिळणेबाबत अर्ज महाविद्यालयात सादर केलेला आहे. याबाबत मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली.

सदर सभेने चर्चा करून कु. भिंगवडे याने द्वितीय वर्षात प्रवेश घेतला नसल्याने त्याची शैक्षणिक फी माफ करणेस परवानगी दिली. तसेच शाळा सोडल्याचा दाखला देण्यात यावा व महाविद्यालयात असलेले शैक्षणिक कागदपत्रे (10th & 12th Mark list, Domicile, Income Certificate, Caste Certificate, Cast Validity, etc.) देण्यात यावे असे सभेने सुचविले.

**विषय क्र. १४.१० - श्री. कदम एम. व्ही. भांडारपाल यांनी निलंबनापूर्वी खरेदी केलेल्या NAAC काळातील बिलांबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. १४.१०.** - श्री. एम. व्ही. कदम भांडारपाल यांनी निलंबनापूर्वी NAAC कमिटीच्या काळात विविध साहित्यांची किरकोळ खरेदी केलेली होती. त्यांचे दि. २८.११.२०१९ च्या पत्रानुसार दि. २९.११.२०१९ पासून निलंबन करण्यात आले होते. सदर खर्च केलेली बिले एकूण रक्कम रू. १०,१००/- दि. ०२.०२.२०२३ च्या अर्जाने सादर केलेली आहेत. संस्था नियमानुसार प्रत्येक खर्च हा ज्या त्या वर्षातच खर्ची पडला पाहिजे. तदनंतर खर्ची पडणाऱ्या रक्कमेस BOG तसेच संस्था मान्यता घ्यावी लागते. त्यानुसार मा. प्राचार्य यांनी वरील बिलांबाबत सभेस माहिती दिली. सभेने सदर बिला बाबत चर्चा करून खरेदी केलेल्या NAAC काळातील बिलांची रक्कम खर्ची टाकण्यास परवानगी दिली.

**विषय क्र. १४.११ - मार्च २०२२ मध्ये पुणे येथे झालेल्या खरेदी समितीच्या सभेकरिता झालेल्या खर्चास परवानगी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. १४.११.**- महाविद्यालयातील खरेदी समितीची सभा मा. श्री. बोथे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली एस. एम. जोशी महाविद्यालय हडपसर, पुणे येथे मार्च २०२२ रोजी घेण्यात आली होती. सदर सभेसाठी प्रवास, जेवण व इतर खर्च एकूण रक्कम रू. २७,४५४/- इतका खर्च झालेला होता. सदर खर्चास सभेने चर्चा करून परवानगी द्यावी.

याबाबत मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. त्यानुसार सभेने वरील झालेल्या खरेदी समितीचा अहवाल तपासून व चर्चा करून सदर खरेदी सभेसाठी झालेला एकूण २७,४५४ /- खर्चास परवानगी दिली.

**सूचक -: डॉ. सौ. माने सुनिता व्ही.**
**अनुमोदक -: प्रि. डॉ. विठ्ठल शिवणकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

**विषय क्र. १५ - मा. चेअरमन याचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.**

**विषय क्र. १५ .०१. महाविद्यालयातील वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले शिक्षकेत्तर सेवकांनी विविध मागण्यासाठी केलेल्या अर्जाबाबत.**

**ठराव क्र. १५:०१ -** महाविद्यालयातील वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले शिक्षकेत्तर सेवकांनी वेतन आयोगानु वेतनातील फरकाची रक्कम, महागाई भत्त्यातील फरकाची रक्कम उपदान रक्कमेतील फरकाची रक्क सुधारित वेतन निश्चीतीनुसार १२ व २४ वर्षानंतर देय असणार्या कालबद्ध पडोन्नतीचे फायदे मिळणेबाबत अर्ज सादर केलेला आहे. याबाबत सभेने चर्चा करून मार्गदर्शन करावे.

याबाबत महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी माहिती दिली. सदर सभेने चर्चा करून महाविद्यालयाती वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले शिक्षकेत्तर सेवकांना वेतन आयोगानुसार वेतनातील फरकाची रक्क महागाई भत्त्यातील फरकाची रक्कम उपदान रक्कमेतील फरकाची रक्कम, सुधारित वे निश्चीतीनुसार १२ व २४ वर्षानंतर देय असणा-या कालबद्ध पदोन्नतीचे फायदे इ. बाबी या हे से सेवेमध्ये असताना मंजूर करण्यात आलेले नसल्यामुळे सेवानिवृत्त झालेल्या सेवकांना कोणताही आर्थि फरकाचा लाभ व वरील नुसार आर्थिक बाबी देण्यात येऊ नयेत असे सभेने सूचित केले.

**विषय क्र. १५ .०२. महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रवेशाबाबतची सभेस माहिती देणे**

**ठराव क्र. १५.०२ :-** शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षासाठी प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यां माहिती खालील प्रमाणे -

खालील तक्त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी झालेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या आकडेवा नुसार सभेने चर्चा करून प्रवेशीत विद्यार्थी समाधान व्यक्त केले. तसेच ज्या विभागात प्रवेशित संख्या कमी आहे अशा विभागासाठी विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविण्यात यावेत असे सुचविण्य आले.

**First Year Admission 2022-2023**

| Sr. No. | Branch Name | Intake | Admitted Students |
|---|---|---|---|
| 1. | Computer Science & Engg. | 120 | 138 |
| 2. | Electronics & Telecommunication Engg. | 60 | 68 |
| 3. | Mechanical Engineering | 60 | 37 |
| 4. | Civil Engineering | 60 | 25 |
| **Total** | | **300** | **268** |

Direct Second Year Admission 2022-2023

| Sr. No. | Branch Name | Vacancy | Admitted Students |
|---|---|---|---|
| 1. | Computer Science & Engg. | 15 | 14 |
| 2. | Electronics & Telecommunication Engg. | 14 | 14 |
| 3. | Mechanical Engineering | 45 | 11 |
| 4. | Civil Engineering | 44 | 35 |
| **Total** | | 118 | 74 |

M.Tech 2022-2023

| Sr. No. | Branch Name | Vacancy | Admitted Students |
|---|---|---|---|
| 1. | Electronics Engineering | 18 | 00 |
| 2. | Mechanical - Production Engineering | 09 | 01 |
| **Total** | | 27 | 01 |

**सूचक :- डॉ. सौ. माने सुनिता व्ही.**
**अनुमोदक :- प्रा. डॉ. एम बी कुमठेकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर :-**

**विषय क्र. १५ .०३. महाविद्यालयातील एम.टेक या विद्याशाखेचे प्रवेश (Admission) सातत्याने कमी होत आहेत, त्याबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. १५.०३** - महाविद्यालयात सन २०१७-१८ पासून इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग व मेकॅनिकल-प्रॉडक्शन इंजिनिअरिंग या विद्याशाखेत एम.टेक चे वर्ग सुरु करणेत आले होते. सदरचे वर्ग नियमित पणे सुरु ठेवण्यासाठी दरवर्षी ARA व AICTE यांची मान्यता घ्यावी लागते. तसेच दरवर्षी INTAKE नुसार शिखर संस्थांना फी अदा करावी लागते त्यानुसार मान्यता प्राप्त होते. तसेच INTAKE नुसार शिक्षक सेवकांची नेमणूक करावी लागते. सदरचा खर्च हा प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पेक्षा जास्त होत आहे असे दिसून येते. त्यानुसार महाविद्यालयातील आर्थिक खर्च पाहता एम.टेक विद्याशाखेसाठी आवश्यकते पेक्षा जास्त खर्च होत आहे. त्याअनुषंगाने सध्या वरील दोन विद्याशाखेतील INTAKE शून्य (०) करणेस परवानगी मिळावी. व यथावकाशाने इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग व मेकॅनिकल-प्रॉडक्शन इंजिनिअरिंग या विद्याशाखांचे INTAKE सुरु करणेत परवानगी मिळावी.

याबाबत महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. सभेने चर्चा करून महाविद्यालयाचा आर्थिक खर्चाचा विचार करून एम.टेक या विद्याशाखेचे INTAKE शून्य करणेत यावे व प्रवेशित विद्यार्थ्यांची मागणी वाढल्यास यथावकाशाने वरील दोन विभागातील एम. टेक. साठी प्रवेश सुरू करावेत. असा सभेने चर्चा करून निर्णय घेण्यात आला.

**इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग**

| अ.क्र. | शैक्षणिक वर्ष | INTAKE | प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| ०१. | २०२०-२१ | १८ | ०५ |
| ०२. | २०२१-२२ | १८ | ०१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३. | २०२२-२३ | १८ | ०० |

**मेकॅनिकल-प्रॉडक्शन इंजिनिअरिंग**

| अ.क्र. | शैक्षणिक वर्ष | INTAKE | प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| ०१. | २०२०-२१ | १८ | ०१ |
| ०२. | २०२१-२२ | ०९ | ०१ |
| ०३. | २०२२-२३ | ०९ | ०१ |

**सूचक :- मा. श्री. उदय जाधव**
**अनुमोदक :- प्रा. डॉ. एम बी कुमठेकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर :-**

**प्राचार्य तथा सचिव**
नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी)
कर्मवीर भाऊराव पाटील
कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा